प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९-१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेल्या ध्यानाचा आणि भावना आणि विचारांच्या सकारात्मकतेचा एक विशिष्ट मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण दिव्य प्रकाशाचा (परमेश्वर) एक कण आहोत
- ★ प्रेम हा आपला मूळ स्वभाव आहे
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 1 Issue 8 MAY 2009 Rs. 15

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

सत्ययुगाबद्दल, जाणिवेच्या उंचावण्याबद्दल आणि २०१२ साली पृथ्वीच्या फोटॉन बेल्ट मधे प्रवेश करण्याबद्दल प्रकाशाच्या कार्यकर्त्यांनी आणि माध्यमांनी, खूप ज्ञान गोळा केले आहे. विविध राष्ट्रांच्या शासकांनी मात्र हे ज्ञान लोकांपर्यंत मुद्दामच पोचू दिलेले नाही. कदाचित, भीतीमुळे जो गोंधळ माजेल, त्याला सांभाळणे कठीण होईल, अशा भीतीने त्यांनी असे केले असावे. शासकांसाठी सामान्य माणसे म्हणजे फक्त निवडणुकींची मते आहेत. त्यांच्यासाठी या माणसांच्या मतांची संख्या महत्त्वाची आहे. आध्यात्मिक पुढाऱ्यांसाठी प्रत्येक व्यक्ति एक आत्मा आहे व ते त्याच्या आध्यात्मिक प्रगतीची जबाबदारी घेत असतात. नवल ह्याचे वाटते की, प्रसार माध्यमाने या नव्या ज्ञानाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. ही फार दु:खाची गोष्ट आहे.

इंटरनेटवर, गोळा केलेले हे सर्व ज्ञान, उपलब्ध आहे. आपण वेळ वाया न घालवता, इंटरनेट आणि ब्लॉग्सवरून हे ज्ञान वेचून घ्यायला हवे. आपल्याला माहीत असायला हवे की, या जगात काय घडते आहे आणि पुढे काय घडणार आहे. आपल्याला २०१२ सालासाठी, नव्या युगासाठी तयारी करायला हवी. आम्ही या संबंधी एक व्यापक पुस्तक प्रसिद्ध केले आहे, "न्यू एज रिआलिटीज्, बियॉन्ड ईस्ट ॲन्ड वेस्ट". १८-०५-२००९ ला, "२०१२" या नावाने एक विशेष पुस्तक आम्ही प्रसिद्ध करणार आहोत. या दोन्ही पुस्तकांतून, आम्ही वाचकांपुढे फार महत्त्वाचे ज्ञान प्रस्तुत करीत आहोत. ह्यासोबतच लोकांना संभाव्य घटनेसाठी विशेष प्रशिक्षण देऊन तयार करण्याची पण माझी इच्छा आहे. एकप्रकारे आमच्या ध्यानवर्गातून आम्ही ते करतच आहोत पण ही खेदाची गोष्ट आहे की कोणीच जागृत होतांना किंवा त्यासाठी तयारी करताना दिसत नाही. मला कोणीही याबद्दल काळजी करताना दिसत नाही मग सावध होणे तर दूरच.

सर्व तयारी शेवटपर्यंत पुढे ढकलत राहणे हा मानवी स्वभाव आहे. सर्व वाईट घटना इतर कोठेतरी आणि इतरांसोबतच होणार आहेत, आपण मात्र नेहमीच अगदी सुरक्षित असणार आहोत असा समज करून घेणे हा सुद्धा मानवी स्वभावच आहे. मला लोकांमधे भीती निर्माण करायची नाही, मी फक्त वस्तुस्थितीची जाणीव करून देत आहे.

लोकांना पूजा करायला खूप आवडते. देवाची पूजा, दगडाची आणि माझी सुद्धा पूजा करणे त्यांना आवडते! कारण पूजा करणे सोपे आहे! पूजा करणे सोपे आहे, पण गुरूंनी शिकवलेल्या गोष्टींचे आणि तत्त्वांचे पालन करणे कठीण आहे आणि कंटाळवाणे सुद्धा आहे!

मी सदैवच पूजित होण्यापासून स्वत:ला वाचवले आहे पण काही वेळा माझ्या नकळत अचानक मी लोकांच्या तावडीत पूजेसाठी सापडलो सुद्धा आहे. अशा वेळी मला वाटतं की कोणाच्याही नकळत मी दिसेनासा होवो आणि कधीच परत त्याजागी प्रकट न होवो. माझ्या जवळील लोक मला समजू शकतात आणि त्यामागील सत्यांना ते जाणतात. पूजा ही प्रेम आणि आदर व्यक्त करण्याची कृती आहे पण आपल्या पूजाविधींमधे असे आढळत नाही. पूजेची भावना व्यक्त करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे गुरूंनी शिकवलेल्या तत्त्वांचे समंजसपणे आणि शांतपणे पालन करणे. पूजा म्हणजे फक्त एकदाच केलेली कृती नाही तर पूजा म्हणजे गुरूंच्या आदर्शांवर जगण्याचा सततचा प्रयास होय.

या ग्रहावर आता माझे सत्तर वर्षांचे वास्तव्य पूर्ण होणार आहे। मला आनंद आहे की, मी या ग्रहावर आलो आणि इथे वास्तव्य केले. इथे मी खूप काही शिकलो, खूप सुंदर अनुभव घेतले आणि खूप चांगल्या लोकांना भेटलो. मी माझ्या गुरूंचे कार्य पुढे चालवले आणि मला ह्याची जाणीव आहे की, अजून पुष्कळ कार्य करायची राहिली आहेत. एक जीवनकाळ यासाठी पुरेसा नाही. म्हणूनच मी इथे परत परत येईन. जेव्हा मी सीमाचा लेख आणि ट्विंकलचे लिखाण वाचले, तेव्हा त्यांचे माझ्यावरील प्रेम आणि समज पाहून मला गहिवरून आले. मी त्यांच्या शब्दांप्रमाणे तंतोतंत जगण्याचा प्रयत्न करीन. एखादी व्यक्ति जास्तीत जास्त तेवढेच करू शकते. ❑

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, बंगलोर अर्बन ५६२ १४९. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१ (सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत)
इ-मेल : info@saptarishis.com वेबसाईट : www.saptarishis.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ६ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिले कॉलम वाचावे.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. २००/–**

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.

**GURUJI'S BLOG**
lightdivine.blogspot.com

## ७ एप्रिल २००९, गुरुजींची मुंबईला भेट



पु. ल. देशपांडे हॉल, विले पार्ले, मुंबई येथे, सुमारे चारशे लोक गुरुजींची आतुरतेने वाट पाहत जमले होते. लोकांना सत्ययुगाच्या, २०१२ सालाच्या व फोटॉन बेल्टच्या वास्तविकतेबद्दल जागृत करणे, या हेतूने गुरुजी तेथे गेले होते. या वास्तविकतेसाठी स्वतःला तयार करण्यास त्यांनी आखलेली एक कार्य योजना देखील त्यांनी लोकांना सांगितली. प्रकाश प्रसारण करुन मुंबईस बरे करणे हा देखील त्यांचा उद्देश होता.

ह्या प्रसंगी 'प्रकाशवाट' व 'आय् गुरुजी' ह्या दोन मराठी पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

## काही ठळक घडामोडी

- गुरुजींच्या सत्तराव्या वाढदिवसाच्या प्रसंगी चार भाषांमधे ७ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात येईल.
- त्या दिवशी 'आय् गुरुजी (भाग २)', '२०१२ एन ओव्हरव्यू' आणि 'द लाईट' ह्या तीन पुस्तकांचे देखील प्रकाशन करण्यात येईल.
- २९ मार्च रोजी आनेकल येथे व १४ आणि १५ एप्रिल रोजी तपोनगर येथे गुरुजींनी ओरियंटेशनचे वर्ग घेतले.
- आनेकल येथे साधना वर्ग सुरु करून एक वर्ष पूर्ण झाल्या निमित्त २७–४–२००९ रोजी वार्षिकोत्सव समारंभ साजरा करण्यात आला.
- १८–५–२००९ रोजी चिक्कगुब्बि येथे नवीन बस स्टॉपचे उद्घाटन करण्यात येईल.

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०२ | शनिवार | शुक्लाष्टमी |
| ०४ | सोमवार | शुक्लदशमी |
| ०९ | शनिवार | बुद्ध पौर्णिमा |
| १७ | रविवार | कृष्णाष्टमी |
| २३ | शनिवार | शिवरात्री |
| २४ | रविवार | अमावस्या |

## रविवारच्या प्रसादाचे प्रायोजक

| | |
|---|---|
| शांता आणि अलमेलू | ०१–०३–२००९ |
| संजय एस. करकरे, स्वरूपा राणी, सलील कारखानिस आणि एक हितचिंतक | ०८–०३–२००९ |
| पुंडलीक ढाकोरकर आणि रीना गुजराल | १५–०३–२००९ |
| रूपा के. एस. आणि सी. स्वामिनाथन | २२–०३–२००९ |
| स्मिता शेट्टी आणि अजय कुमार एम. | ३१–०३–२००९ |

रू. २००० देऊन रविवारच्या प्रसादाचे आणि रू. ५००० देऊन वृत्तपत्राचे प्रायोजक आपण होऊ शकता.

## गुरुजींचा वाढदिवस समारंभ

रविवार, २४ मे २००९

| | | |
|---|---|---|
| सकाळी ११ वाजता | – | ओंकार<br>स्वागत<br>व्याख्यान<br>गुरुजींचे व्याख्यान<br>पुस्तकांचे प्रकाशन<br>विशेष ध्यान<br>गुरुजींकडून आशीर्वाद |
| दुपारी १२.३० वाजता | – | प्रसाद |

## तपोनगरातील कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दर रविवारी | – | व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत |
| | – | विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| दर शुक्रवारी | – | प्रकाश प्रसारणाचे कार्य सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |
| ०९ मे | – | बुद्ध पौर्णिमा, विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| १० मे | – | शंबला ध्यान दुपारी २ वाजता |
| ३१ मे | – | अखंड ध्यान सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |

## तपोनगर डायरी

तपोनगर हे सध्या बंगलोर शहराच्या अगदी जवळील गावात आहे. परंतु बंगलोर शहर इतक्या झपाट्याने वाढते आहे कि लवकरच तपोनगर बंगलोर शहराचाच एक भाग होईल यात शंका नाही. बंगलोरच्या नव्या अंतरराष्ट्रीय विमानतळाला जाणारा आणखी एक रस्ता ह्या सप्तर्षी केंद्राच्या अगदी जवळून जातो. नवीन रस्त्यांमुळे येथे पोहोचणे सोपे झाले आहे व आता येथे कमी वेळात पोचता येते. तरी देखील थोडेसे आड वाटेला असल्यामुळे येथील नीरव शांतता कायम आहे. तपोनगर, शहराच्या जवळ असूनही दूर आहे. ते जणू काही गुरुजींचे वाक्य, "ऐहिक व आध्यात्मिकतेचे संतुलन करा" याला सार्थ करीत आहे.

तपोनगर येथे राहणाऱ्यांची संख्या जरी वाढली असली तरी सभोवतालची हिरवळ व पक्षी ह्यात विशेष बदल झालेला नाही. एके काळी इथे विविध प्रकारचे पक्षी होते व एक विख्यात पक्षीशास्त्रज्ञ त्यांचा अभ्यास करण्यासाठी इथे राहत होता. ह्या गावाचे चिक्कगुब्बि हे नाव अगदी समर्पक आहे. कानडी भाषेत त्याचा अर्थ होतो "एक छोटी चिमणी".

येथून साधारण अर्धा किलोमीटर अंतरावर एक सुंदर सरोवर आहे. अनेकांस ह्याची माहिती नाही. पाणी कमी असून देखील त्यात अनेक प्रकारचे जीव–जंतू, पक्षी व साप राहतात. ह्या सरोवराच्या दुसऱ्या बाजूला जवळच अंतर–मानसा आहे.

ह्या भागात अनेक साप आहेत आणि विशेष करून तपोवनात. अपूर्व पक्षी, विंचू, ससे व नाग देखील अंतर–मानसा च्या परिसरात दिसतात.

वीस वर्षांपूर्वी गुरुजींनी तपोनगरास जन्म दिला. निसर्गाच्या कुशीत असलेले तपोनगर, देवत्वाला प्रकट करते. ❑

## गुरुजी, ट्विंकलचे बॅटमन

ट्विंकल, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर

(ट्विंकल आणि गुरुजी एकमेकांना हजारो वर्षांपासून ओळखतात आणि सध्याच्या आयुष्यात २५ वर्षांपासून, म्हणजे ट्विंकलच्या जन्मापासून ओळखतात.)

मला जर बॅटमामा किंवा बॅटमॅन बद्दल बोलावयास सांगितले तर मी काय बोलेन असा विचार मी किती तरी काळ करीत आले आहे. आजमिती पर्यंत मला त्याचे उत्तर सापडलेले नाही. कदाचित वर्णन करायला पर्याप्त शब्द मला कधीच सापडणार नाहीत. तुमचाच घटक असलेल्या गोष्टीचे तुम्ही वेगळेपणाने वर्णन कसे करणार? ज्याप्रमाणे आपल्या आईवडिलांवर आपण किती प्रेम करतो ते व्यक्त करायला शब्द अपुरे पडतात. बस्स! ते फार मौल्यवान आहेत एवढेच आपण म्हणू शकतो.

मी कायमचेच भाग्यवान राहिले आहे कारण मला नेहमीच माझ्या आई–वडिलांचे व कुटुंबाचे प्रेम लाभले आहे आणि दुधात साखर म्हणून माझ्याजवळ बॅटमॅन सुद्धा आहे.

आठवणींच्या राज्यात फेरफटका मारताना मला आठवते की, हा बॅटमॅन दृष्टीला पडता क्षणी, शाळेची बॅग फेकून, पायातील बूट कसेही भिरकावून, मी त्यांना मोठ्याने हाका मारीत रस्त्यावरून पळत सुटे आणि चटकन् त्यांच्या अंगावर चढून, त्यांनी मला उचलून घेऊन नेले पाहिजे असा हट्ट करीत असे. पण बरं का, तेव्हा मी केजीत शिकत होते.

आणि कधी कधी बॅटमॅन व मी किराणा मालाच्या खरेदी साठी त्यांच्या मोपेडवर घराजवळच्या दुकानात जायचो. परत येताना सरळ घरी न येता, माझा चॉकलेट बार संपेपर्यंत आम्ही घराभोवतीच्या सर्व निरनिराळ्या गल्ल्यांमधून हिंडायचो. अर्थातच ते आमचं छोटंसं गुपित होतं.

मी चार वर्षांची असताना ते चार वर्षांचे व्हायचे, मी पौगंडावस्थेत असताना तेही त्याच वयाचे झाले होते आणि आता जेव्हा मी २५ वर्षांची झाले आहे तेव्हा तेही पंचविशीतले आहेत. ते नेहमीच माझे उत्तम मित्र, मार्गदर्शक आणि त्याहूनही खूप अधिक काही आहेत.

मी बॅटमॅनना नेहमी चिडवते की त्यांच्या जवळ येणाऱ्या प्रत्येकाला ते रडवतात. सांगायचा मुद्दा असा की माणसे धैर्य गोळा करण्याचा कितीही प्रयत्न करीत असली तरी, जेव्हा त्यांना डोके टेकायला खांद्याचा आधार मिळतो तेव्हा ती पटकन् रडून मोकळी होतात. बॅटमॅन असे आहेत. प्रेमाने आणि करुणेने ओतप्रोत भरलेले! त्यांच्याशी बोलणे इतके सोपे आहे कारण ते लक्षपूर्वक ऐकतात. फारसे स्पष्टीकरण न देताही त्यांना समजते आणि मुख्य म्हणजे त्यांच्याशी बोलणाऱ्या माणसाचे ते मूल्यमापन करीत नाहीत. ते नेहमीच आधार देतात. ते पर्याय सुचवतात आणि निर्णय आपल्यावर सोपवतात. निर्णय कधीही लादत नाहीत. आपण योग्य निर्णय घेतला तर उत्तमच. पण जरी आपण चुकलो तरीही ते आधार देतात, सुखरूप बाहेर काढतात आणि आपल्या कृतींच्या परिणामांची जबाबदारी घ्यायला शिकवतात.

ते एक ऋषी आहेत, एक आध्यात्मिक व्यक्तित्व आहेत. जिथे नाही म्हणायला पाहिजे, तिथे ते स्पष्ट नकार देतात. आयुष्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन परिपूर्ण आहे. त्यांच्या जवळचे अमर्याद, निर्मळ प्रेम ते सर्वांना भरभरून देतात. पण तरीही ते सामान्य माणसाप्रमाणे अपरिपूर्ण आयुष्य जगतात ज्यामुळे, जीवनाजवळ देण्याजोगे जे जे आहे त्या सर्वाची मजा अनुभवता येते, चुका करता येतात आणि त्यातून शिकता येते. अशा रीतीने ते या धरेवरील जीवन पद्धतीचा आदर करतात जी परमेश्वराकडून आपल्याला मिळालेली देणगी आहे.

मला बॅटमॅनचा विलक्षणपणा जास्त आवडतो. आमच्या दिवसाची सुरुवात नेहमीच भांडणाने होत असे. मी त्यांना मला सकाळी लवकर उठवायला सांगायचे आणि ते मला उठवायचे देखील. पण इथे मेख अशी आहे की सकाळी लवकर उठवलेले मला अजिबात आवडत नाही. ते चिकाटीने मला उठवायचा प्रयत्न करीत राहायचे आणि मी वैतागून जायचे. वस्तू जागच्या जागी ठेवण्याबद्दल आणि लिहायची टेबले स्वच्छ असण्याबद्दल त्यांना एवढा ध्यास असे की मला वेड लागण्याची पाळी यायची. ते सहजपणे बोलायचे "तुला अगदी माझ्यासारखाच नवरा मिळेल." आणि तसाच मिळाला. आता मी त्यांना जरा धमकावूनच सांगते, "तुम्ही काही चेष्टेत जरी बोललात तरी ते खरे होते. तेव्हा माझ्या बाबतीत जरा दूरच राहाल तर बरे!"

आमच्याजवळ जन्मानुजन्मांच्या एवढ्या आठवणी साठल्या आहेत की मला त्यात इतरांना सहभागी करून घ्यायला आवडेल. पण मग थोडा विचार करता असेही वाटते की त्या आठवणी आमची "छोटी गुपिते" म्हणून तशाच ठेवाव्या. ❑

## प्रकाश प्रसारणाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणातील चळवळ आहे. आपल्या या जगात सर्वांना शांती आणि प्रेमाचे जीवन जगता यावे त्यासाठी ही चळवळ आहे. व्याख्यानं, उपदेशं आणि पताका नसलेली ही अशी वेगळीच चळवळ आहे. वरील उच्च जगांतून फक्त प्रकाश पृथ्वीवर आणावा आणि सर्वत्र प्रसारित करावा, एवढेच पुरेसे आहे. शब्द जे करू शकत नाही, ते सर्व हा प्रकाशच घडवून आणू शकतो.

जेव्हा आपण हा प्रकाश सर्वत्र पसरवतो, तेव्हा तो इतरांच्या घरात व त्यांच्या हृदयात प्रवेश करतो. त्यांच्या भावना आणि विचारांमधे असलेल्या अंधःकाराला हा प्रकाश दूर करतो आणि अशाप्रकारे वैयक्तिक बदलाव होतात. वैयक्तिक बदलावांमुळे सर्व जगच बदलायला सुरुवात होते आणि प्रकाशमय होते.

हा प्रकाश म्हणजे आपल्या डोळ्यांना दिसत असलेला प्रकाश नसून हा अस्तित्वाच्या गाभ्यातील अतिसूक्ष्म प्रकाश आहे. अस्तित्वाच्या ह्या गाभ्यातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्वकाही आहे; ताकद आहे, शहाणपण आहे आणि सृष्टीचे भवितव्य पण आहे. तो अदृश्य आहे पण सर्वत्र पसरलेला आहे.

**आपण दर रोज ७ मिनिटांसाठी हा प्रकाश वरून पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवू शकतो. झोपून उठल्यावर सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी आपण ह्याचा अभ्यास करू शकतो आणि या जगात बदल घडवून आणू शकतो.**

या जागतिक चळवळीची सुरुवात १८–५–२००८ ला तारामंडलीय परिषदेनी, सप्तर्षींनी, गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत सुरु केली.

ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**प्राचीन ऋषींनी दिलेली ही सात तत्त्वे आहेत. आपल्या पृथ्वीवर असलेले प्रकाशाचे शहर शंबला येथे राहणारे लोक या तत्त्वांचा अभ्यास करतात. शंबलातील लोक चिरतरुण आहेत आणि ते शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगत असतात.**

१. आपल्या अंतरंगात, गाभ्यात असलेल्या प्रकाशाचा अनुभव करावा आणि सभोवताली पसरवावा.
२. प्रेमाचा अनुभव करावा आणि हे प्रेम सर्वत्र पसरवावे.
३. सर्व जीवांमधे आणि सर्व निर्जीव वस्तुंमधे जीवनाच्या एकत्वाचा अनुभव करावा.
४. दिवसाची सुरुवात करतांना, त्यादिवशी जी कामं करायची आहेत, ती आधी मनात ठरवावी, मग ती हळू आवाजात स्वतःशीच पुटपुटावीत आणि मग ती कामं प्रत्यक्ष करावीत.
५. आपले ध्येय पूर्ण होण्याआधी त्याबद्दल कमीत कमी बोलून, गुप्ततेच्या नियमाचे पालन करावे.
६. आपल्यातील नकारात्मक शक्तींशी लढा देण्यासाठी मन, बुद्धी आणि शरीर यांना एकजूट करावे.
७. उच्च आध्यात्मिक ध्येय गाठण्यासाठी आपण स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवावी.

## सोलुंट्रा किंग यांचे व्याख्यान

संकलन: सोमायाजी, अनुवाद: एकनाथ कुलकर्णी

**०१-०३-२००९**

प्रकाश प्रसारणाच्या जागतिक चळवळी निमित्त झालेला कार्यक्रम म्हणजे कित्येक युगांनंतर घडणारी एक अतिशय महत्त्वपूर्ण घटना होती. सर्व आयामांमधील अनेक देवांनी, देवींनी आणि प्रत्यक्ष प्रकाशाने या घटने साठी कार्य केले. आपल्या सर्वांच्या वतीने मी प्रकाशाचे, सृष्टीच्या निर्मात्याचे, आपणा सर्वांना मिळालेल्या आशीर्वादांबद्दल आणि कृपा-प्रसादाबद्दल आभार प्रकट करते.

आपणांपैकी काहीजण, आपण कोण आहात, ह्याबद्दल अनभिज्ञ असाल. आपण सर्व दैवी जगातील प्रकाश-जीव असून आपण प्रकाशासाठी अनेक आयुष्ये काम करीत आहात. २६ फेब्रुवारीला जो प्रकाश या पृथ्वीवर सर्वांना मिळाला, त्याच्यामुळे अनेक गोष्टींना वेग आला आहे. आजपर्यंत जे काम आपण करत होतो, त्याची सांगता या दिवशी झाली. परंतू काय चालले आहे ह्याची कल्पना नसलेले अनेक लोक पृथ्वीवर असल्यामुळे आपले कार्य खूप वाढले आहे. प्रकाशामुळे मानवतेत सर्वदूर पसरलेला अंध:कार उघडा पडतो आहे. अंध:कार नष्ट होण्यासाठीच असे होते आहे.

महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान शिव अवतरले. आज सुद्धा ते आपल्या बरोबर आहेत. मला त्यांच्याकडून हे कळले कि,२६ तारखेला जेव्हा शक्ती अवतरली, तेव्हा देवीने स्वत:ला पृथ्वीवरील सर्व जगांमधे पसरवले आणि सर्व राक्षस गण जे आजतागायत पृथ्वीवर होते त्यांना अक्षरश: हुसकवून लावण्यात आले. ते पृथ्वी सोडून त्यांच्या उगमाकडे निघून गेले. त्यानंतर देवी म्हणाली कि आता कलियुग संपले आहे आणि प्रकाश युगाची पहाट झाली आहे.

सर्व सृष्टीचा जो निर्माता आहे, अशा परमेश्वराकडूनच हा प्रकाश पृथ्वीवर अवतरला. हा प्रकाश इतका शक्तिशाली आहे, कि आपली शरीरे त्यास धारण करण्यास असमर्थ आहेत. परंतू आपण आजपर्यंत जी पूर्व-तयारी करत होतो, त्यामुळे आपल्यावर विपरीत परिणाम झाला नाही. आपण तो प्रकाश धारण करू शकलो आणि सर्व लोकांपर्यंत पसरवू शकलो.

या प्रकाशाने आपल्या बाह्य आणि अंतर जगां मधे एक वाट निर्माण करुन दिली आणि बाह्य आणि अंतरजग मिळून एक झाले. असे झाल्यामुळे आपण सर्वजण एकत्वाच्या जाणिवेत प्रवेश करीत आहोत. प्रकाश युगाची पहाट होण्यासाठी ही गोष्ट फारच महत्त्वाची आहे. ❑

**०८-०३-२००९**

येत्या तीन वर्षांमध्ये, आपण शेकडो वर्षांमध्ये सुद्धा प्राप्त करू शकणार नाही, अशा गोष्टी मिळवू शकतो, आणि म्हणूनच हा अतिशय खास काळ आहे. हा दीर्घ अनुग्रहाचा काळ आहे. फोटॉन वलयातून आपल्याला आत्ताच मिळत असलेल्या शक्तिंबद्दल आपण जागरुक झालेच पाहिजे.

ह्या शक्तिंनी अतिशय विस्मयकारक पद्धतीने काम देखील करणे सुरु केले आहे. नैसर्गिक आपत्ती, मोठे अपघात होत आहेत. जुन्या व्यवस्था कोलमडून पडणे ही सकारात्मक गोष्ट आहे. ऋषींनी बनवलेल्या दैवी व्यवस्था जन्म घेत आहेत. ह्या नवीन व्यवस्था आपल्याला फोटॉन वलयात आणि नव युगात सुरक्षित आणि सहजपणे घेऊन जातील. या सर्व गोष्टींची आपल्याला जाणीव होण्यासाठी आपण ध्यान केले पाहिजे, आपल्या आत्म्याशी संपर्क साधला पाहिजे आणि सर्व व्यवस्थेच्या प्रवाहा बरोबर असले पाहिजे. सोलुंट्राने अतिशय समर्पक पणे म्हटले आहे, प्रेम करा व स्वीकार करा . हाच आपल्या सप्तर्षी मार्गाचा आता मंत्र बनला आहे.

कोणत्याही प्रकारच्या साधनेच्या मार्गावर असेच असले पाहिजे. ध्यान करण्यास सुरू करुन आध्यात्मिक साधना अंगिकारुन स्वत:चा विकास करून घ्या. ख्रिस्ताने सांगितल्या प्रमाणे लहान मुलांसारखे विशुद्ध आणि साधे व्हा. मग आपण कुठेही असलो तरी चांगले आणि कार्यक्षम राहू शकतो.

जेव्हा आपण विशुद्ध असतो तेव्हा आपण कार्यक्षम असतो. शुचिता आपल्याला आपल्या सर्व शक्ती एकवटण्यास मदत करते. आणि आपल्याला आपला परमपिता परमेश्वराची, गुरूंची आणि ऋषींची सुद्धा शक्ती मिळते. एकदा का आपण शुद्ध झालो आणि परमेश्वराच्या संपर्कात असलो तर सर्व विश्वाचे सामर्थ्य आपल्यासोबत असते.

दैवी असणे एक प्रकारे सोपे आहे पण मनुष्य असणे किती अवघड आहे! आपण दैवी असलात तर परिपूर्ण असाल, आधीच बनून तयार झालेल्या त्रुटिरहित वस्तू प्रमाणे असाल आणि परमेश्वराच्या निकट असाल. परंतु एक साधारण मनुष्य देवत्वाला पोहचण्यासाठी किती संघर्ष करतो, कित्येक आव्हानांना तोंड देतो. अर्थात या संघर्षामध्ये एक निराळेच सौंदर्य आहे. अशा प्रकारे धडपड करत असताना आणि आव्हानांना सामोरे जात असताना आपला विकास होतो. आपल्या विकासाची ही प्रक्रिया अतिशय सुंदर आणि आनंददायक असू शकेल जर आपण त्याचे मर्म जाणून घेतले तर! म्हणूनच मी म्हणतो की, मनुष्य असणे इतके सोपे नाही.

## गुरुजी उवाच

संकलन: सोमायाजी, अनुवाद: एकनाथ कुलकर्णी

**२२-०३-२००९**


प्रत्येक युगामध्ये आपण इथे ऋषींच्या सहवासात राहून आपला विकास करण्याचा प्रयत्न करतो. ऋषी म्हणतात अशा प्रकारे प्रयत्न करत राहण्याची ही शेवटची फेरी असावी. आपण साधनेच्या अंतिम टप्प्यावर आहोत आणि कित्येक युगांपासून याच टप्प्यावर आहोत! आपण हा टप्पा पार करून पुढे केव्हा जाणार? आपण खरोखरच साधना मना पासून अंगिकारली आहे काय? आपण खरोखरच जर सृष्टीबद्दल, आयुष्याच्या हेतूबद्दल आणि फोटॉन वलयाबद्दल नीट समजून घेतले, तर आपण साधना अतिशय गंभीरपणे घेवू.

लोक माझ्याकडे अनेक प्रकारच्या विनंत्या घेऊन येतात. मी येथे, केवळ मदत करण्या करिता, शक्य त्या सर्व पद्धतींनी आणि सर्व पातळींवर सहाय्य करण्या करिताच आहे. माझा इथे असण्याचा मुख्य हेतू म्हणजे, लोकांना साधने मध्ये प्रगती करण्यात मदत करणे आणि साधनेचा अर्थ समजावून देणे, असा आहे. तसेच आपण माझ्याकडे आणाल त्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर देणे, भावनिक किंवा आध्यात्मिक समस्यांवर उपाय शोधणे यासाठी मी सदैव तयार आहे. परंतु या करिता व्यक्तिश: भेटण्याची गरज नाही.

मी आपल्याला मला भेटण्यापासून परावृत्त करीत नाही. ह्या भेटींमध्ये सुद्धा एक प्रकारचे सौंदर्य आहे. आणि मला सुद्धा लोकांना भेटायला खूप आवडतं. मला त्यात आनंद मिळतो. परंतु जेव्हा आपल्याला तातडीने भेटायचे असते व मी कामात व्यस्त असतो तेव्हा सर्वात उत्तम मार्ग म्हणजे निश्चल अवस्थेमध्ये बसणे आणि मनाने संपर्क साधणे. मला माहीत आहे की हा मार्ग यशस्वी आहे कारण शेकडो वेळा मी असे अनुभवले आहे. अलीकडेच मला एक पत्र मिळाले, ज्यामध्ये एका व्यक्तिने काही समस्यांबद्दल लिहीले होते. आधी त्याने पत्र लिहीले होते, पण तो ते पोस्ट करू शकला नाही. मला पत्र मिळण्यापूर्वीच त्या व्यक्तिच्या सर्व समस्या दूर झाल्या.

जेव्हा एखाद्या समस्येबद्दल पत्र लिहिण्याचा विचार आपल्या मनात येतो, त्याच क्षणी ऋषींना पण त्या समस्येची माहिती होते. तुम्ही जर अतिशय तणावपूर्ण परिस्थितीमध्ये असाल, तर एका शांत जागी बसावे आणि ऋषींशी संपर्क प्रस्थापित करावा. संपर्क त्वरित होतो आणि आपल्याला मदत लगेच मिळण्यास सुरुवात सुद्धा होते. ❑





गुरुजी – १९८१ साली, महर्षी अमरांच्या कार्यात सहभागी होण्यापूर्वी



गुरुजी – १९९५ साली, मानसा संकुला समोर असताना



गुरुजींचा विद्यार्थी, रवि शाह ह्यांची शिल्पकृती

## गुरुजींच्या उक्ति

संकलन: सोमायाजी, अनुवाद: जयंत देशपांडे

- जेव्हा स्वत:ला बदलणे हे आपल्या साधनेचे एकमात्र ध्येय असते, तेव्हा आपल्या सर्व समस्यांचे निराकरण होते।
- साधनेचे खरे आव्हान त्याच्या पाठपुराव्यात आहे.
- आध्यात्मिकतेकडे आपण तर्कांच्या पलीकडे जाऊन बघायला हवे ।
- प्रत्येक बदल आणि प्रत्येक घटना, ही परमेश्वराची एक देणगीच आहे।
- इच्छे शिवाय जीवन नाही।
- योग तेव्हा घडतो जेव्हा आपल्या आणि परमेश्वराच्या इच्छा एक होतात.
- मूर्ती केवळ एक प्रतीक असते. देव मूर्तीच्या पलीकडे असतो.
- प्रलय हा असा काळ आहे, जेव्हा आपल्याला निवड ही करावीच लागते.
- नकारात्मक विचार आणि भावनांचा आता जाणीव पूर्वक त्याग करण्याची वेळ आलेली आहे.
- तुम्ही जर एखाद्या व्यक्तिकडे बघून अतिशय प्रेमाने स्मित करू शकलात तर तुम्ही ऋषींचे कार्य करत आहात. अशा प्रत्येक स्मितातून सत्य युग पसरते.
- प्रत्येक आत्म्याला त्याच्या जबाबदाऱ्या असतात.
- अंधकाराला आपल्या मनातल्या मनात नकार द्या. अशा नकारांच्या संयुक्त कंपनांमुळे एक चळवळ सुरु होते. ❑

## मार्गदर्शक प्रकाश, माझे गुरुजी

संकलन: श्यामला देवी, अनुवाद: वैशाली जोशी

माझ्या गुरूंनी मला शिकवले की, शांततेने व समाधानाने जीवन जगण्यासाठी जीवनातील सत्य व ईश्वराच्या विद्वत्तेचा स्वीकार करणे जरूरी आहे. मनातील नकारात्मकता, मुळापासून काढून टाकण्यास त्यांनी माझी मदत केली. मदत व मार्गदर्शन करण्यासाठी ते नेहमी माझ्या सोबत असल्याची जाणीव त्यांनी मला करून दिली व माझ्या आयुष्यातील वडिलांची उणीव भरून काढली.

ते स्वत: ऋषी आहेत परंतु ते असे सांगतात की, ते फक्त देवाच्या व ऋषींच्या कृपेचे एक मानवी माध्यम आहेत. असे माझे गुरू माझ्या जीवनातील एक मार्गदर्शक प्रकाश आहेत. ज्या मार्गावर मी वाटचाल करीत आहे त्यास प्रकाशित करणारे, ऊब देणारे, प्रेमाचा वर्षाव करणारे असे माझे गुरू आहेत. त्यांची परतफेड मी केवळ एकच प्रकारे करू शकते – वाट न चुकून. –वैशाली जोशी

माझ्या गुरूंनी माझे मार्गदर्शन केल्यामुळे मला स्वत:लाच हे आत्मसात झाले की, "एका रात्रीत काहीही बदलता येत नाही. सर्व काही ईश्वराच्या कायद्याप्रमाणे घडत आहे. ह्याचा अर्थ असा नाही कि आपण आपले प्रयत्न थांबवावेत. आपण फक्त प्रयत्न करावे आणि सगळे काही सर्वव्यापी परमेश्वरावर सोडून द्यावे म्हणजे सर्व सुरळीत होते."

–शांता कुमारी

माझ्या गुरूंची भेट होई पर्यंत, प्रकाश, दिव्यता व शरणागति हे माझ्यासाठी केवळ शब्द होते. पहिल्यांदा गुरुजींना भेटण्याचा अनुभव म्हणजे प्रत्यक्ष प्रकाशाला भेटण्यासारखा होता. त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द हा मंत्रा सारखा होता. जणू काही त्यांच्या उच्चारण्याने प्रत्येक शब्द जीवंत होऊन स्पंदन पावत होता. त्यामुळे गुरुजींची व्याख्याने समजून घेण्यास मला सोपे झाले.

जेव्हा पासून मला गुरुजींचे दैवी संरक्षण मिळाले आहे, तेव्हा पासून माझ्यात खूप बदल झाला आहे व मनुष्यतेकडे कल वाढला आहे. ते माझ्या जीवनात श्वासाप्रमाणे आहेत. –भाग्यवती बी

मी माझ्या गुरूंमधील प्रकाशाकडे आकर्षित झालो आणि साधनेचे व आध्यात्मिकतेचे सुंदर जग माझ्याकरता उघडले गेले. तेव्हापासून हा प्रकाश माझे सतत संरक्षण करीत आहे, मला नित्य नव्या संधी देत आहे आणि स्वत:ची प्रगती करण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. जेव्हा जेव्हा मी जीवनाच्या परीक्षेत खरा उतरलो नाही तेव्हा तेव्हा मला दोषी ठरवण्या ऐवजी मला जास्त मदत आणि सहाय्य करण्यात आले. माझ्या गुरूंच्या प्रकाशाशिवाय मी आध्यात्मिक व ऐहिक अशा दोन्ही पातळींवर जगू शकलो नसतो. माझ्या गुरूंमुळे माझ्या जीवनाचा हा प्रवास अतिशय शांत, सुखद आणि आनंदी झाला आहे. –सुधाकर एल

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाही, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड आणि मराठीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट मानसा फाऊंडेशनच्या नावाने काढावा. बंगलोर बाहेरील चेक असल्यास रू. ५० अधिक जोडावे.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही. ❑

## गुरुजी, आमच्या जीवनातला प्रकाश

(संकलन : श्यामला देवी, अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

जेव्हा मी अंधारात हरवून गेलो होतो आणि त्यालाच सत्य मानून चाललो होतो, तेव्हा ते माझ्या आयुष्यात आले आणि त्यांनी मला प्रकाश दाखवला. त्यांनी मला जाणीव करून दिली की या घोर अंधःकारात देखील आपल्या अंतरीच्या ईश्वरी प्रकाशाच्या साह्याने आपण स्वतःला उजळू शकतो. आजुबाजूच्या जीवनात अहंकाराचे वर्चस्व असलेल्या पद्धतींचेच राज्य चाललेले पाहून मी विचार करीत होतो की अशा या जगात आपला कसा काय निभाव लागणार, त्याच वेळी ते माझ्या जीवनात आले आणि त्यांनी अधिक उज्ज्वल आयुष्याची वाट दाखवली.

आत्म्याला स्पर्श करणाऱ्या संगीतात, बालकाच्या निर्व्याज हास्यात व सूर्यास्ताच्या आणि चंद्रोदयाच्या दैवी सौंदर्यात चमचमणारा ईश्वरी प्रकाश त्यांनी आम्हाला दाखवला. त्यांनी हृदय ओतून इतकं प्रेम आणि ज्ञान दिलं की मी ते पुरतं आत्मसातही करू शकलेलो नाही. मला माझी स्वतःची पसंती, आवड, नावड आहे आणि माझे स्वतंत्र अग्रक्रम आहेत. ते यापैकी कशावरही भाष्य करीत नाहीत. एक ना एक दिवस मला माझे सर्व अग्रक्रम समर्पणाच्या भावनेने त्यांच्या अग्रक्रमांशी एकजीव करायचे आहेत. ते मात्र नेहमी प्रमाणे त्या दिवसाची नक्की वाट पाहत असणार. —जयंत देशपांडे

एकोणीस वर्षांपूर्वी मला माझे गुरू भेटले; साधे, विनम्र, व्यवहारी आणि अतिशय निगर्वी. ते पारंपारिक गुरूंपेक्षा प्राध्यापकच जास्त वाटत होते. आज जरी ते सूक्ष्म स्तरावर ऋषींबरोबर कार्य करणारे महान योगी असले, तरी आजही ते तसेच आहेत. मी त्यांना अमर्याद प्रकाशाच्या रूपात ओळखते. ते खऱ्या अर्थाने गुरू आहेत.

ते एक असे परिपूर्ण मार्गदर्शक आहेत ज्यांनी ह्या ऋषींच्या मार्गाची उभारणी तत्त्वांवर केली आहे. आत्मतुष्टीकरणाला त्यांच्याजवळ मुळीच स्थान नाही. ते एखाद्या व्यक्तिमधून ऋषी घडवू शकतात; ऋषींशी, अंतर्यामीच्या प्रकाशाशी आणि अंतिम सत्याशी थेट संपर्क साधण्यात ते प्रत्येक व्यक्तिला मदत करू शकतात. परंतु, आपण बंधमुक्त होऊन त्यांच्या जवळ गेले पाहिजे आणि त्यांची शिकवण तंतोतंत पाळली पाहिजे. सूक्ष्म पातळीवर काम करण्यासाठी घडविलेला पहिला ऋषी कार्यकर्ता व जे अंतरीच्या प्रकाशाशी संपर्क साधून मार्गदर्शन मिळवू शकतात किंवा ऋषींशी संवाद साधू शकतात असे अनेक साधक, ही त्यांच्या अपरिमित क्षमतांची व उदारपणाची केवळ छोटीशी झलक आहे. असे कार्य केवळ एक ऋषीच करू शकतो. —श्यामला

ते मानवी अधिक आहेत की दैवी? जास्तीत जास्त मर्यादे पर्यंत देवत्वाची प्रचिती देणारे मानव आहेत की मानवी रूपातील देव आहेत? स्वतःच्या अव्यक्त चित्रांमध्ये हरवून जाण्यापासून स्वतःला आवरणारा एक कलाकार, स्वतःच्या भावनांचा ओघ अनिर्बंध वाहू देण्यास तयार नसलेला एक मितभाषी लेखक, आपले विचार समंजसपणे व्यक्त करणारा एक तत्त्ववेत्ता, मर्यादा ओळखून त्या मान्य करणारा एक मानव, असे माझे गुरू आहेत. ते जीवितकार्यासाठी अवतरलेले एक गुरू आहेत – मानवजातीसाठी पुष्कळ स्वप्ने असलेले, प्रत्येकासाठी एक कृतीबद्ध योजना आखणारे, धैर्यवान आणि नवीन युगाविषयी आग्रही असणारे.

ते ईश्वराकडे मानवजातीचे प्रतिनिधित्व करतात आणि ईश्वरावर जगाचा विश्वास बसावा यासाठी स्वतः ईश्वराचे मानवरूप होतात व अशा तऱ्हेने दोघांत दुवा साधतात. सर्व युगातील महान ऋषींच्या परंपरेचे ते प्रतीक आहेत. ते कळप राखणारे धनगर नव्हेत; त्यांना कळप आवडत नाहीत कारण ते प्रत्येकाची ओळख अंतरी वसलेल्या सिंहाशी करून देतात. ते मुक्तीचे द्वार उघडून देतात आणि आपल्याला पांगळे अनुयायी बनण्यापासून वाचवतात.

ते माझे गुरुजी आहेत; माझ्यासाठी परब्रह्म आहेत. वयाच्या सत्तराव्या वर्षी सुद्धा हा प्रकाशाचा अप्रसिद्ध प्रेषित पूर्वीपेक्षाही अधिक जोमाने कार्यरत आहे कारण मानवजातीच्या भविष्याची धुरा त्यांच्या खांद्यावर आता पूर्वीपेक्षाही अधिक आहे. —सीमा अलमेल

भौतिक बदल, आर्थिक आणीबाणी, युद्धे इ. बद्दल हजारोंनी लोक बोलतात, पण फारच थोडेजण आजुबाजूला घडत असलेल्या आध्यात्मिक परिवर्तनाबद्दल अधिकारवाणीने बोलू शकतात. आपले गुरुजी अशाच मोजक्या लोकांपैकी एक आहेत जे इथे, तसेच वरच्या आयामात घडत असलेले आध्यात्मिक बदल पाहू शकतात; संक्रमणावस्थेतून पार पडण्यासाठी, चेतनेच्या उत्थानासारख्या आध्यात्मिक बदलांशी जुळवून घेण्यासाठी, मानवजातीत प्रकाशाची जागृती करण्यासाठी आणि फोटॉन बेल्टमधल्या आपल्या प्रवेशासाठी मानवजातीला मार्गदर्शन करू शकतात.

आपले मार्गदर्शक, आपले गुरुजी, या प्रक्रियेत, आपण कल्पना करू शकणार नाही इतक्या अग्रभागी आहेत. आपल्या गुरुजींना वैश्विक तत्त्वांबद्दल बोलताना पाहून, आयुष्यावर प्रेम करताना आणि हे आयुष्य भरभरून जगताना पाहून, रूढी परंपरांच्या पलीकडे जाऊन आध्यात्मिकतेचे बहुविध पैलू उलगडून दाखवताना पाहून, पारंपारिक स्वामीजी मंडळी चकित होतील. त्यांचा प्रकाश आणि प्रेम मानवजातीसाठी एकमेव आशा आहे.

—के. रामचंद्र

## प्रश्नोत्तर

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. आपण ऋषींशी कसा काय संपर्क साधू शकतो?**

उ. आपल्या अंतरमनाशी आणि आपल्यातील उच्च अंशाशी स्वत:ला जोडून.

**प्र. उच्च अंशाशी आपण कसे काय जोडू शकतो?**

उ. तसे खूप प्रकारे आपण हे करू शकतो. पण सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे प्रेमाने जोडणे, शरण जाणे.

**प्र. एखादा गुरू आपल्या शिष्याच्या शरीरात शिरून त्याच्या किंवा तिच्याकडून विशिष्ट प्रकारचा अभ्यास करवून घेऊ शकतो का?**

उ. हे शक्य आहे, पण एखादा खरा गुरू असे कधीच करणार नाही.

**प्र. दीक्षा मिळाल्यानंतर काही लोकांना मी नाचतांना पाहिले आहे. असे का?**

उ. दीक्षा मिळाल्यानंतर लोक परमानंदाच्या स्थितीला प्रवेशतात. ती स्थिती स्वेच्छेनी आलेली असते. त्याचा दीक्षा मिळण्याशी काहीही संबंध नसतो.

**प्र. आपण ज्या लोकांना भेटतो त्यांच्या आत्म्याचे स्त्रोत आपण जाणून घेऊ शकतो का? म्हणजे तो आत्मा परब्रह्म लोकातून आला आहे कि इतर लोकातून आलेला आहे?**

उ. हे जरा कठीण आहे पण शक्य आहे. काही विशिष्ट गोष्टींचे आकलन न होणेच उत्तम असते. सगळेच आत्मे देवाकडून आलेले असतात आणि हे ज्ञान आपल्याला इतरांबरोबर प्रेमपूर्ण आणि शांतिपूर्ण जीवन जगण्यास मदत करते.

**प्र. आध्यात्मिकता म्हणजे काय ?**

उ. आध्यात्मिक असणे म्हणजे चांगले असणे, सरळमार्गी असणे आणि आचरणात दिखाऊपणा नसणे. आध्यात्मिक असणे म्हणजे सहज आणि समंजसपणे वागणे. आध्यात्मिक असणे म्हणजे सबुरी बाळगणे, लोकांना ऐकणे, पक्षांना ऐकणे आणि आकाशाला ऐकणे. आकाश म्हणजेच देव. आध्यात्मिक असणे म्हणजे संपूर्ण विश्वाला ऐकणे. आध्यात्मिक असणे म्हणजे या विश्वात आणि लोकांमधे जे चांगले आहे, त्याचा अनुभव करण्याचा प्रयत्न करणे.

**प्र. एखाद्या मार्गाची, आध्यात्मिक मार्गाची व्याख्या कशी कराल?**

उ. आध्यात्मिक मार्गात नैतिकमूल्ये असतात आणि स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असतात. आध्यात्मिक मार्ग एखाद्या व्यक्तिची मदत करतो आणि संपूर्ण जगासाठी कार्य करतो.

**प्र. प्रकाश म्हणजे नवी शक्ती आहे का ?**

उ. प्रकाश ही फार प्राचीन शक्ती आहे. प्रकाश आदि पासूनच होता.

**प्र. शरीरसंस्थेत कोण कोणत्या क्षमता असतात?**

उ. जाणीव क्षमता: जाणीव क्षमता ही आत्म्याची क्षमता आहे. ही एक अत्यंत महत्त्वाची क्षमता आहे. जाणीव आपल्याला कोणत्याही लोकाच्या लोकांशी जोडू शकते. जाणिवेमुळेच आपल्याला सर्व ज्ञान आणि सर्व अनुभव मिळतात.

अंत:प्रेरणा: ही अशी क्षमता आहे ज्याने मन किंवा बुद्धीच्या मदती शिवाय एखाद्या गोष्टीचे प्रत्यक्ष आकलन आपल्याला होते.

सद्सद्विवेकबुद्धी: हा आत्म्याचा आवाज असतो, आत्म्याचे शहाणपण किंवा विवेक. सद्सद्विवेकबुद्धी नेहमीच आपल्याला योग्य निवड करण्यात मदत करते.

बुद्धी विचार करते आणि मन भावना व्यक्त करते; भौतिक शरीराला सुद्धा स्वत:ची वेगळी बुद्धिमत्ता आणि शहाणपण असते.

अहंकार म्हणजे शरीर, मन आणि बुद्धी ह्यांची एकत्रित बुद्धिमत्ता. या सर्वांशिवाय आपल्यात छाया पुरुष देखील असतो. आपल्याला सूक्ष्म शरीर असते, तिसरा डोळा असतो. जेव्हा आपण हा तिसरा डोळा कार्यान्वित करतो तेव्हा आपल्याला सूक्ष्मजग आणि सूक्ष्म शरीरे पाहणं शक्य होते. ❑

## ब्रीफ रिट्रीट


गुरुजी कृष्णानंद

मला ह्याची जाणीव आहे की, वेगवेगळ्या आणि गंभीर कारणांसाठी लोक मला भेटू इच्छितात. मला सुद्धा लोकांना भेटायला आवडतं पण कार्य आणि आध्यात्मिक जबाबदाऱ्यांमुळे ते शक्य होत नाही. लोकांशी सहज भेटण्यासाठी मी आय्‌गुरुजी चे सत्र सुरु केले पण निवड करून ठराविक लोकांनाच आम्हाला त्यात सामील करता आले. माझ्यासाठी हे समाधानकारक नव्हतं. आता, दर तिसऱ्या शनिवारी, मी ब्रीफ रिट्रीट चे आयोजन करीत आहे. मी यासाठी आपल्या नियमित आणि बाहेरील विद्यार्थ्यांचे व इतर कोणाचेही, ज्याला माझ्या सोबत अनौपचारिक पण गंभीर गोष्टी करायच्या आहेत, अशांचे स्वागत करतो.

रिट्रीट मधे सहभागी होण्यासाठी आपण मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावयास हवे.

## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| iGuruji | 150/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| A Package from the Rishis (containing 5 Booklets) | 250/- |
| - How to Meditate | |
| - Dhyana Yoga | |
| - Descent of Soul | |
| - Practising Shambala Principles | |
| - Astral Ventures of A Modern Rishi | |
| The Masters Answer | 120/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Patanjali Yoga Sutra | (out of print) |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| ಬೆಳಕಿಗೆ ಬಾಗಿಲುಗಳು | 150/- |
| ಋಷಿಗಳಿಂದ ಬಂದ ಜ್ಞಾನ | 150/- |
| ಐ-ಗುರೂಜಿ | 150/- |
| ಅನಿಸಿಕೆಗಳು | 120/- |
| ಋಷಿಗಳಿಂದ ಬಂದ ಕೊಡುಗೆ (ಐದು ಪುಸ್ತಕಗಳು) | 250/- |
| - ಧ್ಯಾನ ಮಾಡುವುದು ಹೇಗೆ | |
| - ಧ್ಯಾನ ಯೋಗ | |
| - ಆತ್ಮದ ಅವರೋಹಣ | |
| - ಶಂಬಲ ನಿಯಮಗಳ ಅಭ್ಯಾಸ | |
| - ಆಧುನಿಕ ಋಷಿಯೊಬ್ಬರ ಅತೀಂದ್ರಿಯ ಸಾಹಸಗಳು | |
| ಗುರೂಜಿ ನಾ ಕಂಡಂತೆ | 30/- |
| ಬೆಳಕಿನಲ್ಲಿ ಬದುಕುವುದು | 10/- |
| ದೈವಸಾಕ್ಷಾತ್ಕಾರಕ್ಕೆ ರಾಮಕೃಷ್ಣರ ಮಾರ್ಗದರ್ಶನ | 250/- |
| ಕಾವ್ಯಕಂಠ ವಸಿಷ್ಠ ಗಣಪತಿ ಮುನಿಗಳು | 100/- |
| ಆನೇಕಲ್ಲಿನ ಅಪರೂಪದ ವ್ಯಕ್ತಿಗಳು | 120/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/ |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आय्‌गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| தியானம் சைய்வது எப்படி | 50/- |
| ஒளியின் வாயில்கள் | 200/- |
| ஒளீயீல் வாழ்க்கை | 10/- |
| ధ్యానం చేయ్యడం ఎలా | 50/- |
| వెలుగులో జీవించడం | 10/- |



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

"मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र इथे तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### प्रकाशाचे प्रसारण

दर शुक्रवारी १० ते १ वाजेपर्यंत गुरुजींसोबत ध्यान–साधक प्रकाशाचे प्रसारण करतात. ह्यात सामील होण्यासाठी सर्वांचे स्वागत आहे.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. (चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल)

## आध्यात्मिक अनुभव

संकलन: सुधाकर, अनुवाद: सुनिता देशपांडे

माझा भाऊ मुंबईच्या ७ एप्रिल २००९ च्या कार्यक्रमासाठी आला होता तेव्हा तो गुरुजींभोवती असलेले शक्तिचे प्रचंड क्षेत्र पाहू शकला. इतरांप्रमाणे तो सुद्धा लागलीच गुरुजींच्या प्रेमात पडला. जेव्हा तो आशीर्वाद घेण्यासाठी रांगेत ऊभा होता तेव्हा त्याने पाहिले की, तापलेल्या उन्हात सुद्धा खिडकी बाहेरची झाडं आपली पानं नाचवून आपला उत्कट आनंद आणि प्रेम व्यक्त करत होती. ती संवेदनशील व्यक्तित्वं जणूकाही मुंबई शहराच्या भावनांचे प्रतिनिधीत्व करत होती.

पुष्कळ लोकांनी सांगितले की, सात मिनिटांसाठी प्रकाशाचे प्रसारण करताना त्यांनी प्रकाश पाहिला. काहींनी वेगवेगळ्या रंगाचा प्रकाश पाहिला. प्रत्येकानेच तपोनगरातील आनंद आणि शांतीचा अनुभव केला. मी दिव्य शक्तिचा, तेजस्वी प्रकाशरूपात, तीनवेळा थेट गुरुजींकडून येतांना अनुभव केला. –पूर्णिमा परूळेकर

एके दिवशी मी सूक्ष्मरूपानी तपोनगरला आले होते. मी स्वतःला तेजस्वी प्रकाश शरीरात पाहिले. मी मुख्य संकुलात प्रवेश करत होते तेव्हा माझ्या लक्षात आले कि ते बांधकाम विटा किंवा सीमेंटचे नव्हते. ते एका राजवाड्या सारखे होते. मी पायऱ्या चढून वरती ध्यानाच्या वर्गात गेले आणि तिथे मी खूप लोकांना त्यांच्या तेजस्वी प्रकाश शरीरात पाहिले. ते इकडे तिकडे फिरत होते. गुरुजी पण तिथे त्यांच्या संपूर्ण तेजस्वी आणि दैवी स्वरूपात होते. ते बोलत होते आणि आमच्या सोबत चर्चा करत होते. पण आम्ही सर्व लोक बसलेलो नव्हतो, आम्ही उभे होतो, फिरत होतो आणिआजूबाजुला तरंगत होतो. आणि ती इमारत म्हणजे एक सुंदर राजवाडा होता. –विद्या अरोरा

मी प्रकाश प्रसारणाच्या माहिती पत्रकासोबत एका शाळेत गेले आणि ते मी तेथील प्राचार्यांना दिले. त्यांनी त्याच्यावर एकदाच दृष्टिक्षेप टाकला आणि एकदमच अतिशय आदराने त्यांनी मला बसण्यासाठी खुर्ची दिली. मी त्यांच्या वागण्यातील सुखद बदलामुळे आश्चर्यानी चाटच पडले. नंतर त्यांनी मला सांगितले कि त्यांना आपल्या मार्गाबद्दल माहिती आहे आणि त्यांना महर्षी अमरांकडून दीक्षा मिळाली होती!

–ऊमा माहेश्वरी

कोरामंगला इन्डोर स्टेडियम मधे २६ फेब्रुवारी २००९ ला, मी पहिल्यांदा प्रकाशाला अनुभवले. मला असे वाटले कि माझ्या शरीरात असंख्य ट्यूबलाईट्स प्रकाशमान झाले आहेत. मी, खूप तेजस्वी असा पांढरा प्रकाश माझ्या शरीरात आणि संपूर्ण पृथ्वी माझ्या पोटात आहे, असे अनुभवले. सात मिनिटं केव्हा उलटून गेली, हे कळलेच नाही. मला असे वाटले कि मी फक्त काही क्षणांसाठीच प्रकाशाचे प्रसारण केले आहे. मी माझा अनुभव शब्दात सांगण्याचा प्रयत्न करत आहे पण मी काय अनुभवले ते शब्दात सांगणे फारच अवघड आहे. –कविता कानाडे

मार्च महिन्याच्या सुरुवातीला मला ध्यान करताना हा अनुभव आला होता. मला माझ्या भौतिक शरीरामधून काढून वेगळ्याच एका पृथ्वीवर नेण्यात आले आणि मला सोनेरी प्रकाशाचे अग्नि–गोळे आपल्या पृथ्वीमातेवर फेकण्यासाठी देण्यात आले. माझ्या अपेक्षेविरुद्ध ते हलके नसून चांगलेच जड होते. जसेच मी आपल्या पृथ्वीमातेवर ते गोळे भिरकावले, आपली पृथ्वी दुभंगुन त्यातून काळ्या रंगाची वाफ वजा पदार्थ निघाला. मी फारच घाबरून गेले आणि ध्यानानंतर खूप थकून सुद्धा गेले होते. मी ठरवले की, दुसऱ्या दिवशी काय होते ते पहावे कारण मला वाटत होते कि कदाचित माझे मन काही खेळ खेळत असावे. दुसऱ्या दिवशी जेव्हा मी अग्नि–गोळे भिरकवत होते तेव्हा मला असे वाटले की, ऋषी खुष होऊन टाळ्या पिटत होते आणि आनंदाने हसत होते. मला सांगण्यात आले कि घाबरण्याचे काही कारण नाही कारण सूक्ष्म पातळीवर अशा रीतीने पृथ्वीतून तो काळा पदार्थ काढण्यात येत होता. त्यामुळे, पुढे जेव्हा मला हे काम सांगण्यात आले तेव्हा मी ते केले.

२६ फेब्रुवारीला संध्याकाळी ७.३० वाजता, आम्ही मुंबई वरून, मानसिक संपर्क साधून, गुरुजी आणि प्रकाशाचे प्रसारण करण्यासाठी जमलेल्या इतर लोकांसोबत, प्रकाश प्रसारण कार्यात सहभागी झालो होतो. ध्यानाला सुरुवात करता क्षणीच आम्ही सकारात्मक शक्ती अनुभवू शकलो. मला पाण्याकडे प्रकाश केंद्रित करण्यास सांगण्यात आले. पाण्यातून पुढील संकट येण्याची शक्यता होती. त्याशिवाय मला क्वार्क वर प्रकाश केंद्रित करण्यास सांगण्यात आले. पहिल्यांदा मला वाटले क्वार्क म्हणजे दुर्मिळ पक्षी आहे, पण जेव्हा मी त्याचा अर्थ शोधला तेव्हा माझ्या हे लक्षात आले कि क्वार्क हा निसर्गातील सगळ्यात सूक्ष्म कण आहे! –झरीन ॲन्शिया

PRAKASHMARG An Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation, Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban-562 149.
Editor : Jayant Deshpande